# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 23/02/2024 (शुक्रवार) सायंकाळ

---

## पो.स्टे. अरोली हद्दीमधील निमखेडा बाजार चौक येथे जुगार अड्डयावर धाड

## —: नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई :—

दिनांक २२/०२/२०२४ रोजी पोलीस स्टेशन अरोली येथील स्टाफ अवैध धंद्यावर रेड संबंधाने पेट्रोलिंग करीत असतांना पोलीस स्टेशन अरोली येथील निमखेडा बाजार चौक येथे काही इसम ५२ ताश पत्त्यावर पैशाची बाजी लावुन जुगाराचा खेळ खेळत आहे. अशी गोपनिय माहीती पोलीस स्टेशन अरोली येथील स्टाफला प्राप्त झाले वरून सदर स्टाफ यांनी निमखेडा बाजार चौक येथे जावुन पाहणी केली असता त्या ठिकाणी लोकांची गर्दी दिसली. तेथे पोलीसांना पाहुन काही लोक पळु लागले. त्यांना स्टाफच्या मदतीने पकडण्यात आले. सदर ठिकाणी सापळा रचुन छापा टाकुन **आरोपी नामे— १) देवानंद हरीचंद्र वाढवे वय ४६ वर्ष रा. निमखेडा २)संदिप दामाजी राणे वय ४६ वर्ष रा. ओडी टोला सडक अर्जुनी जि गोंदिया ३)सूभाष कवडू खंगार वय ३४ वर्ष रा. निमखेडा ४) राजकूमार भैयालाल नागपूरे वय ४५ वर्ष रा. मोगरा जि गोंदिया** ह.मू. निमखेडा ता मौदा हे पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगार खेळतांनी मिळुन आले. एकुण ०४ जुगारी इसम यांना ताब्यात घेवुन त्यांचे ताब्यातुन १) ५२ तासपत्ते व नगदी ३८००/— रू. २) एकूण ०४ मोबाईल किंमती २३०००/— रू. असा एकूण २६८००/— रू. चा मुद्देमाल जप्त करून आरोपीतांविरूध्द पोलीस ठाणे अरोली येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंदवुन नमुद आरोपीतांना सुचनापत्रावर सोडण्यात आले.

सदरची कार्यवाही ही पोलीस अधीक्षक श्री. हर्ष पोद्दार, अपर पोलीस अधिक्षक श्री. रमेश धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोस्टे अरोली येथील ठाणेदार सपोनि. निशांत फुलेकर पोलीस हवालदार संदीप बाजनघाटे, शाम पोकळे, होमगार्ड निलेश कावळे, अंगत गयगये यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

## चोरीच्या गुन्हयातील आरोपी नागपूर ग्रामीण पोलींसानी केले अटक

यातील फिर्यादी संजय मधुकर चौव्हाण, वय ४५ वर्ष, रा. नवटे, पोस्ट– हरचेरी, ता. जि. रत्नागिरी, ह. मु कोहळी–मोहळी शिवार, कोहळी ता. कळमेश्वर, जि. नागपूर यांचे मालक गंगाराम चाटीला रा. गोरेगाव मुंबई यांना उप मध्य विदयुत अभियंता मध्य रेल्वे ऑफिस नागपूर यांचे कडून कोहळी कळमेश्वर या दरम्यान तिसऱ्या रेल्वे ट्रॅकचे लाईनवर ईलेक्ट्रीक ओव्हर हेड वायरचे कामचे टेंडर मिळाल्याने सदर ठिकाणी फिर्यादी हे सुपरवायझर म्हणून काम करत असता सदर कामाचे सामान ठेवण्या करिता राजेंद्र पांडुरंग तापसे रा. मोहळी यांचे रूम भाडयाने केले होते. सदर रूमचे परिसरात सदर रेल्वेचे कामा करिता लागणारी तांब्याची कटनरी कॉपर वायर व कॉन्टॅक्ट कॉपर वायर ठेवलेली होती. सदर ठिकाणी ठेवलेली वेगवेगळी तांब्याचे वायर पैकी शिल्लक १००० मीटर कि. २,४८,००० रू. चा. कटनरी कॉपर वायर सदर रूमचे बाहेर खुल्या जागेत ठेवलेली होती. सदर वायर ठेवलेले ठिकाणी नसल्याचे निदर्शनास आल्यानंतर सदर वायर चोरीला गेली असल्याचे दिसून आल्याने अज्ञात व्यक्तीचे विरोधात पो.स्टे. कळमेश्वर येथे अप क्र. ९५७/२०२३ कलम ३७९ भादवि गुन्हा दाखल करून तपासात घेण्यात आला.

नमुद गुन्हयाचे तपासात **आरोपी क्र. ०१) नामे– धर्मेंद्र रामगोपाल शाहू वय २१ वर्ष, रा. गंगानगर दिपक किराण जवळ, गिट्टीखदान, नागपूर व ०२) अनिलकुमार किशोरीलाल शाहु, वय २७ वर्ष, रा. गॅम्लर, टेलर्स च्या बाजुला, गिट्टीखदान नागपूर**

यांचे कडून चोरीला गेलेले माला पैकी त्यांनी विकत घेतलेली एकूण १९ किलो तांब्याची तार जप्त करून त्यांना नमुद गुन्हयात अटक करण्यात आली होती. त्यांनी नमुद माल हा अनोळखी ईसमांकडून विकत घेतला असल्याचे सांगितले होते.

पो. स्टे. कळमेश्वर कलम अप क्र ९७५/२०२३ कलम ३९२, ३९५, ३९८, ३४२, ४५८, ४११, ३४ भादंवि गुन्हयाचे तपासात **आरोपी नामे नौशाद सादतुल्ला कुरेशी, वय ३२ वर्ष, रा. वार्ड न. ०२. आमराई वार्ड, बैंक ऑफ इंडियाचे मागे, घुगुस, ता. जि. चंद्रपुर** यास अटक करून विचारपूस केली असता नमुद आरोपी याने पो. स्टे कळमेश्वर अप. ९५७/२०२३ कलम ३७९ भादंवी गुन्हयात घटनास्थळावरून अन्य व्यक्तींसह येवून चोरी करून **आरोपी नामे– नूर अहमद अब्दुल कुरेशी, वय ३६ वर्ष, रा. बिमबा गेट, बिलाल कॉलनी ता. जि. चंद्रपूर** याने दिलेले पीकअप वाहनाने सदर मुद्देमाल चंद्रपूर येथे नेवून आरोपी नूर अहमद अब्दुल कुरेशी याला विकल्याचे त्याचे विचारपूसी दरम्यान सांगितले. यावरून नमुद आरापी याचा पो स्टे. चंद्रपूर सीटीचे हद्दी शोध घेतला असता, मिळून आल्याने त्याला गुन्हया बाबत विचारपूस केली असता त्याने नमुद गुन्हयात चोरी करणे करिता जाणे करिता वाहन दिल्याचे व चोरीचा माल विकत घेतल्याचे कबूल केल्याने त्याला पो. स्टे. कळमेश्वर येथे आणून नमुद गुन्हयात दिनांक २१/०२/२०२४ रोजी अटक केले. आरोपी नूर अहमद अब्दुल कुरेशी याने सांगितल्याप्रमाणे गुन्हयात चोरीला गेलेला माला पैकी ४७५ किलो, किंमती २,८५,०००/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सदरची कार्यवाही ही पोलीस अधीक्षक श्री. हर्ष पोद्दार, अपर पोलीस अधिक्षक श्री. रमेश धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोस्टे कळमेश्वर येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक योगेश कामाले, तसेच पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय कोलते, पोलीस अंमलदार मनीष सोनोने, विवेक गाडगे, हितेश चौधरी, हेमंत चौधरी यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर